# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **नगरविकास विभागाचा** सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(२) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सार्वजनिक बांधकाम विभागाचा** सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**तीन** : **लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१ ते ३)**

(१) **सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, जयंत पाटील, पांडुरंग बरोरा, शशिकांत शिंदे, राधाकृष्ण विखे-पाटील, अमीन पटेल, सुनिल केदार, मो. आरिफ (नसीम) खान, अजय चौधरी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका**

**चव्हाण, सर्वश्री. सुरेश लाड, हसन मुश्रीफ. वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दि. २८ फेब्रुवारी, २०१७ पासून सुरु करण्यात आलेल्या बारावीच्या परिक्षेची प्रश्नपत्रिका परिक्षा सुरु होण्या अगोदर तब्बल २५ मिनिटांपूर्वी म्हणजेच १०.४० मिनीटांनी प्रश्नपत्रिका व्हॉटसअॅपवर उपलब्ध झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात आली असतानाच ही घटना घडल्याचे पुन्हा एकदा समोर येणे, इंग्रजी, गाणित, एसपी आणि मराठी या विषयांच्या प्रश्नपत्रिका मुंबई परिसरात व्हॉटसअॅप या सामाजिक माध्यमावर उपलब्ध झाल्याचे समोर येणे, याबाबत मंडळाच्या मुंबई विभागीय कार्यालयाकडून तसेच शासनाकडून कोणतीच दखल घेतली न जाणे, त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

(२) **अॅड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. सुनिल केदार, अस्लम शेख, डॉ. संतोष टारफे वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्हा येथील स्त्री रुग्णालयात गत नऊ महिन्यात ६ हजार १४४ अर्भकांचा जन्म झाला असुन त्यापैकी १३१ बालकांचा प्रसुती दरम्यान मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, जिल्हयातील बहुतांश गरीब महिला प्रसूतीकरिता जिल्हा स्त्री रुग्णालयात येत असुन विविध कारणांनी प्रसूतीदरम्यान बालकांचा मृत्यू होत असणे, अमरावती जिल्हा रुग्णालयात गर्भवती महिलांना दुर्गम भागातील उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रामधून पाठविण्यात येत असल्यामुळे डफरीन रुग्णालयात आणण्यात येईपर्यंत गर्भवती महिलांची प्रकृती खालावत असणे, जिल्हा स्त्री रुग्णालयात वॉर्डामध्ये २०० खाटांची संख्या असुन दररोज किमान ३५० महिला रुग्ण विविध वार्डात उपचार घेत असणे, अपूरा कर्मचारीवर्ग व अदययावत साधनसामुग्री अभावी या बालमृत्युचे प्रमाण अधिक असल्याने नवजात मुलांच्या पालकांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. सुरेश हाळवणकर, सुनिल शिंदे, संतोष दानवे वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील सर्वच क्षेत्रातील कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी योजना राबविणारे मंडळ स्थापन करण्याऐवजी सर्वच असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी एकच कल्याणकारी

मंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, त्यामध्ये यंत्रमाग कामगार, शेतमजूर, पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते, रिक्षाचालक, ट्रकचालक, वाहनचालक आदी घटकांचा समावेश असणे, या सर्व घटकांच्या उत्पन्नावर सेस लावून उत्पन्नाचे साधन निर्माण करणे सुध्दा शासनाच्या विचाराधीन असणे, सदर घटकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी, आरोग्य सुविधा, विमा यासारख्या कोणत्याही कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत नसणे, परिणामी हे घटक आर्थिकदृष्टया अप्रगत राहून सामाजिक विषमता निर्माण होणे, याबाबत मा. अर्थमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत राज्यातील सर्वच क्षेत्रातील कामगांरासाठी एकच कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे सदरचे कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**चार : सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस).**

(१) गृह विभाग.

(२) नगरविकास विभाग.

(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

(४) गृहनिर्माण विभाग.

(५) पर्यावरण विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**(दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला सभागृह नेते यांचा प्रस्ताव)**

**पाच : सभागृह नेते यांचा प्रस्ताव –**

भारताच्या माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त, सन्माननीय पद्मविभूषण श्री.शरदचंद्रजी पवार, खासदार, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री यांच्या संसदीय कारकिर्दीस ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तसेच महाराष्ट्र विधानसभेचे जेष्ठ सन्माननीय सदस्य, माजी मंत्री व माजी विरोधी पक्ष नेते श्री.गणपतराव देशमुख यांच्या संसदीय कारकिर्दीला ५५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दलच्या प्रस्तावावर चर्चा.

**सहा : सर्वश्री. सुनिल प्रभु, राज पुरोहित, सदा सरवणकर, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री अजय चौधरी, सुनिल शिंदे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री रमेश लटके, योगेश सागर, तुकाराम काते, मंगेश कुडाळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. अमीत साटम, अशोक पाटील, अतुल भातखळकर, सुनिल राऊत, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. प्रकाश सुर्वे, मंगलप्रभात लोढा, प्रकाश फातर्पेकर, सरदार तारासिंह, संजय पोतनीस, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. संजय केळकर, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"मुंबई शहरात असलेल्या १६ हजार जुन्या उपकर प्राप्त इमारतींमध्ये ४ लाखांपेक्षा जास्त कुटुंबिय राहत असणे, त्यापैकी गेल्या ४० वर्षाच्या कालावधीत केवळ ६७२ इमारतींचा पुनर्विकास झालेला असणे, १५०० इमारती जमिनदोस्त करून तेथील सुमारे २१ हजारांपेक्षा जास्त कुटुंबिय संक्रमण शिबिरात गत १५ ते २० वर्षापासून राहत असणे, विकासकांनी पर्यायी निवासाचे मान्य केलेले भाडे व अनेक वर्षापासून थकविलेले भाडे देण्याची आवश्यकता, जुन्या इमारतीमध्ये राहणाऱ्या लाखो रहिवाश्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करणे, राज्य शासनाचे गृहनिर्माण धोरण राबविण्यामध्ये विकासकांकडून सहकार्य न मिळणे, मुंबईतील बी.पी.टी., रेल्वे इत्यादीच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांसाठी राबविण्यात आलेल्या एसआरए गृहनिर्माण प्रकल्पांची झालेली दूरवस्था, १०० वर्षाहून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीच्या भाडेकराराचे नुतनीकरण न झाल्यामुळे त्या इमारतीचा पुनर्विकास खोळंबला असणे व परिणामी तेथील रहिवाश्यांचे जीव धोक्यात येणे, मुंबईतील वरळी भागातील झोपडपट्टी पुनर्विकासाचे अनेक प्रलंबित प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या मालकीच्या जागांवर गिरणी कामगारांना घरे बांधून देण्याच्या योजनेला गती देणे, बोरीवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करून अतिक्रमणांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.वनमंत्री, मा.गृहनिर्माण मंत्री, मा.वन राज्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ मार्च, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.